■ RNI NO. MAHMAR/25/A3029

■ लातूर

■ वर्ष : ७ वे, अंक नं. : ३६

■ दि. २७ मे २०२६, वार : बुधवार

■ पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

# माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री, लोकनेते विलासराव देशमुख यांना ८१ व्या जयंतीनिमित्त विलासबागेत जनसमुदायाचे भावपूर्ण अभिवादन

## भावस्वरांजलीच्या स्वराभिषेकाने बाभळगाव येथे आदरांजली सभा संपन्न; हजारो स्नेही व कार्यकर्त्यांची उपस्थिती






**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या राजकारणातील लोकाभिमुख नेतृत्व, ग्रामीण भागाशी घट्ट नाळ जोडून जनसामान्यांना केंद्रस्थानी ठेवणारे माजी मुख्यमंत्री आणि माजी केंद्रीय मंत्री लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांची आज मंगळवार, दि. २६ मे रोजी ८१ वी जयंती अत्यंत भावपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. राजकारण, प्रशासन आणि महाराष्ट्राच्या विकासाचा समतोल साधत प्रगतीला नवी दिशा देणाऱ्या या लाडक्या नेत्याच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी बाभळगाव येथील विलासबागेतील स्मृतीस्थळी कुटुंबीय, नातेवाईक आणि लातूर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातून आलेल्या हजारो स्नेही मंडळींच्या उपस्थितीत भावपूर्ण अभिवादन करण्यात आले.

सोमवार दि. २६ मे रोजी सकाळी ९ वाजता विलासबाग, बाभळगाव येथे 'भावस्वरांजली' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आदरणीय विलासराव देशमुख आणि देशमुख परिवारावर प्रेम करणारे स्नेही, मित्र, हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्वांनी स्मृतीस्थळी पुष्पांजली अर्पण करून आपल्या आवडत्या नेत्याला आदरांजली वाहिली.

प्रारंभी, सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख, राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा आमदार अमित विलासराव देशमुख, विलास साखर कारखाना चेअरमन वैशालीताई देशमुख, लातूर ग्रामीणचे माजी आमदार धीरज विलासराव देशमुख, सौ. दीपशिखा देशमुख, विनायकराव पाटील, उल्हासदादा पवार, जयसिंह देशमुख, अभिजीत देशमुख आणि डॉ. सारिका देशमुख, चि. वंश, कु. दिवीयाना, यांनी आदरणीय विलासराव देशमुख यांना पुष्पांजली अर्पण केली.

पं. जितेंद्र अभिषेकी यांच्या शिष्य परिवारातील ज्येष्ठ शिष्य सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक हेमंत पेंडसे व त्यांचे सहकारी यांनी शास्त्रीय संगीताच्या माध्यमातून 'भावस्वरांजली' सादर केली, यातून आदरांजली सभेला भावपूर्ण स्वरूप प्राप्त झाले. यावेळी खासदार डॉ. शिवाजी काळगे, माजी आमदार वैजनाथराव शिंदे, महापौर जयश्री सोनकांबळे, उपमहापौर ड. स्नेहल उटगे यांच्यासह लातूर जिल्हा आणि संपूर्ण महाराष्ट्रातून विविध क्षेत्रातील हजारोंच्या संख्येने आलेल्या स्नेहमंडळींनी लोकनेत्याला पुष्पांजली अर्पण करून आदरांजली वाहिली.

यावेळी अशोकराव पाटील निलंगेकर, आबासाहेब पाटील, ड. व्यंकट बेद्रे, जगदीश बावणे, अभय साळुंके, व्हा. चेअरमन विजय देशमुख, व्ही. पी. पाटील, दिलीप पाटील नागराळकर, ललीतभाई शहा, श्रीशैल उटगे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष शिवाजी जवळगेकर, ड. किरण जाधव, चेअरमन अनंतराव देशमुख, व्हा. चेअरमन प्रमोद जाधव, व्हा. चेअरमन अशोक काळे, व्हा. चेअरमन प्रविण पाटील, व्हा. चेअरमन विजय देशमुख, ड. दिपक सुळ, बी.व्ही.मोतीपवळे, दिलीप माने, डॉ. हणमंत किणीकर, डॉ.बी. आर.पाटील, यशवंत पाटील, सर्जेराव मोरे, रविंद्र काळे, गोविंद बोराडे, >> पान ४

# शहापूरचा 'शिष्यवृत्ती पॅटर्न' यशस्वी, ठाणे जिल्ह्यातील ३९५ विद्यार्थी पात्र

**ठाणे/प्रतिनिधी :** – महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे आयोजित इयत्ता पाचवी पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा आणि इयत्ता आठवी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ च्या अंतरिम निकालात ठाणे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. जिल्ह्यातील एकूण ३९५ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत. विशेषतः ग्रामीण आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या यशाने जिल्ह्याच्या शैक्षणिक गुणवत्तेचा ठसा राज्यपातळीवर उमटविला आहे.

इयत्ता पाचवीच्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेसाठी जिल्ह्यातील ५,०१९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ४,६७० विद्यार्थी परीक्षेला उपस्थित राहिले. या परीक्षेत ३८४ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. यात शहापूर तालुक्याने सर्वाधिक २५६ विद्यार्थ्यांसह जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. याशिवाय मुरबाड तालुक्यातील ६७, भिवंडीतील ३४, कल्याणमधील १६ आणि अंबरनाथमधील ११ विद्यार्थ्यांनी यश मिळविले आहे. तसेच इयत्ता आठवीच्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेसाठी जिल्ह्यातील ६८६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ६१५ विद्यार्थी परीक्षेला उपस्थित राहिले. या परीक्षेत ११ विद्यार्थी पात्र ठरले असून, त्यामध्ये शहापूर तालुक्यातील ८, मुरबाड तालुक्यातील २ आणि अंबरनाथ तालुक्यातील १ विद्यार्थ्याचा समावेश आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांची आवड निर्माण व्हावी, तसेच शैक्षणिक गुणवत्ता सुधारावी यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने या शिष्यवृत्ती परीक्षांसाठी व्यापक नोंदणी मोहीम राबविली होती.

ग्रामीण आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशामागे शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, अतिरिक्त तासिका, नियमित सराव परीक्षा, पालकांचे सहकार्य आणि विविध सामाजिक संस्थांचे योगदान महत्त्वाचे ठरले आहे. अनेक स्वयंसेवी संस्था, शिक्षक संघटना आणि उपक्रमशील शिक्षक विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शन, प्रश्नसंच तसेच सराव परीक्षा उपलब्ध करून देत आहेत.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेच्या विकासासाठी शिष्यवृत्ती प्रक्रिया ही 'शहापूर पॅटर्न' पद्धतीने संपूर्ण जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. तसेच मिशन भरारी, एनएमएमएस आणि नवोदय शिष्यवृत्ती परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना अधिक सक्षम करण्यासाठी विशेष नियोजन करण्यात येणार आहे. संपूर्ण जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत संपादन केलेल्या यशाबद्दल सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि मार्गदर्शकांचे अभिनंदन.

**– रणजित यादव,**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

# बकरी ईदनिमित्त २८ मे रोजी शासकीय रुग्णालयांची ओपीडी बंद

***लातूर/प्रतिनिधी :*** *काही दिनदर्शिकांमध्ये बुधवार, २७ मे २०२६ रोजी बकरी ईदची सुट्टी दर्शवण्यात आली असली, तरी महाराष्ट्र शासनाने बकरी ईदची सार्वजनिक सुट्टी गुरुवार, २८ मे २०२६ रोजी निश्चित केली आहे. त्यामुळे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग गुरुवार, २८ मे २०२६ रोजी बंद राहील.*

*शासकीय रुग्णालयांचा बाह्यरुग्ण विभाग बुधवार, २७ मे २०२६ रोजी नियमित वेळेप्रमाणे पूर्णवेळ सुरू राहील, तर गुरुवार, २८ मे रोजी सुट्टी असल्याकारणाने पूर्णपणे बंद राहणार आहे. शासकीय रुग्णालयातील ओपीडी विभाग गुरुवारी बंद असला, तरी रुग्णालयाची आपत्कालीन सेवा २४ तास अविरत सुरू राहील, असे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. संतोषकुमार डोपे यांनी कळविले आहे.*

# आचारसंहितेमुळे १ जून रोजीचा जिल्हास्तरीय लोकशाही दिन स्थगित

***लातूर/प्रतिनिधी :*** *लातूर जिल्ह्यात दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित करण्यात येणारा जिल्हास्तरीय लोकशाही दिन स्थगित करण्यात आला आहे. सद्यस्थितीत महाराष्ट्र विधान परिषदेच्या उस्मानाबाद–लातूर–बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूक–२०२६ ची आदर्श आचारसंहिता लागू आहे. या आचारसंहितेच्या अंमलबजावणीमुळे आगामी सोमवार, १ जून २०२६ रोजी जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजित केला जाणार नाही, अशी माहिती लातूरचे प्रभारी उपजिल्हाधिकारी (सामान्य) गणेश पवार यांनी दिली आहे.*

# खारेगाव टोलनाक्याजवळ एडिबल ऑईलच्या नावाखाली बेकायदेशीर डिझेलची वाहतूक करणारा टँकर जप्त

## ४६.५ लाखांचा मुद्देमाल हस्तगत जिल्हाधिकाऱ्यांचे कडक कारवाईचे निर्देश

**ठाणे/प्रतिनिधी :** मुंबई–नाशिक महामार्गावरील खारेगाव टोलनाक्याजवळ ठाणे शहर गुन्हे शाखा घटक–१ आणि शिधावाटप विभागाच्या संयुक्त पथकाने एक मोठी आणि धाडसी कारवाई केली आहे.

खाद्यतेलाच्या नावाखाली बेकायदेशीररीत्या डिझेल सदृश ज्वलनशील पदार्थाची वाहतूक करणारा एक मोठा टँकर या पथकाने जप्त केला असून या कारवाईत तब्बल ४६ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

लोकांची दिशाभूल करण्यासाठी संबंधित टँकरवर 'ईडीबल ऑईल' (खाद्यतेल) असे लिहिण्यात आले होते. या प्रकरणी मुख्य आरोपी चालकासह एकूण ८ जणांविरुद्ध कळवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हे शाखा घटक–१ ला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे खारेगाव टोलनाक्याच्या अगोदर, मुंब्रा वळण रस्त्याजवळ सापळा रचण्यात आला होता. या ठिकाणी संशयास्पद टाटा कंपनीचा टँकर (क्रमांक चक-४६-इइ-७१३४) थांबवून त्याची तपासणी केली असता, त्यात मोठ्या प्रमाणात ज्वलनशील द्रव पदार्थ आढळून आला. टँकर चालकाकडे या डिझेल सदृश पदार्थाची वाहतूक करण्याचा कोणताही परवाना, खरेदी बिल किंवा वैध कागदपत्रे




नव्हती. प्रकरणाचे गांभीर्य ओळखून उपनियंत्रक शिधावाटप विभाग, ठाणे यांच्या आदेशानुसार शिधावाटप अधिकारी श्री. सुभाष रामनाथ डुंबरे व त्यांच्या पथकाला तातडीने घटनास्थळी पाचारण करण्यात आले.

या संयुक्त तपासणीत टँकरच्या ५ कप्प्यांमध्ये एकूण २५,००० लिटर बेकायदेशीर डिझेल सदृश पदार्थ आढळून आला. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये २४ लाख ५० हजार रुपये किमतीच्या २५,००० लिटर डिझेल सदृश पेट्रोलियम पदार्थाचा आणि २२ लाख रुपये किमतीच्या टाटा टँकरचा समावेश आहे.

नियमानुसार तपासणी अधिकाऱ्यांनी घटनास्थळावरून रासायनिक चाचणीसाठी नमुने गोळा केले असून, टँकर व इतर मुद्देमाल पोलिसांच्या स्वाधीन केला आहे.

प्राथमिक तपासणीत महत्वाची माहिती समोर आली असून सर्व आरोपींनी स्वतः च्या आर्थिक फायद्यासाठी संगनमत करून विरार खाडीच्या किनारी बोटीमधून आणलेले डिझेल टँकरमध्ये भरले होते आणि ते नाशिकच्या दिशेने घेऊन जाण्याचा त्यांचा बेत होता. पेट्रोलियम पदार्थांची वाहतूक करण्याचे कोणतेही वैध मापदंड न पाळता, सामान्य टँकरमधून अशी धोकादायक वाहतूक करून नागरिकांच्या जीवितास मोठा धोका निर्माण करण्याचे कृत्य आरोपींनी केले आहे. या प्रकरणी मुख्य आरोपी चालक धर्मेद्रकुमार श्यामलाल पटेल (वय ३७ वर्षे, रा. वाशी, नवी मुंबई) याला अटक करण्यात आली आहे. तसेच टँकर मालक रितेश अभय नारायण सिंग (रा. दिवा, ठाणे) यांच्यासह पालघर व सुरत येथील रोशन शिरोडकर, नितीन कोली, राजू पंडित, दीपक पवार, सागर पाटील आणि अनिल सुरत या इतर ७ साथीदारांची नावे निष्पन्न झाली आहेत.

शिधावाटप अधिकारी श्री. सुभाष रामनाथ डुंबरे यांच्या फिर्यादीवरून सर्व आरोपींविरुद्ध जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५, मोटार स्पीरीट अँड हायस्पीड डिझेल ऑर्डर २००५ आणि बायोडिझेल धोरण २०२१ च्या विविध कलमांन्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून पोलीस निरीक्षक अशोक रावजी उतेकर या गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

या मोठ्या कारवाईच्या पार्श्र्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि जिल्हा पुरवठा अधिकारी सर्जेराव मस्के–पाटील यांनी ठाणे जिल्ह्यातील जनतेला जाहीर आवाहन केले आहे की, जिल्ह्यात डिझेल व तत्सम इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध असून नागरिकांनी घाबरून जाण्याचे कोणतेही कारण नाही. जनतेने कोणत्याही प्रकारचा अतिरिक्त इंधन साठा करून ठेवू नये आणि इंधनाच्या तुटवड्याबाबत पसरणाऱ्या कोणत्याही अफवांवर विश्र्वास ठेवू नये.

अवैध वाहतूक करणाऱ्याविरुद्ध प्रशासनाकडून अत्यंत कडक कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशाराही जिल्हा प्रशासनाने दिला आहे.

गुणवंत विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन...
दयानंद शिक्षण संस्था, लातूर संचलित

**दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर**

NAAC Reaccredited (IV Cycle) : A+ (with CGPA 3.38)
Best Collge Award 2025-26 URBAN by SRTMU,Nanded

**शै.वर्ष २०२६-२०२७ करिता प्रवेश देणे चालू आहे**

| अ.क्र. | पदवी अभ्यासक्रम | पात्रता | कालावधी |
|---|---|---|---|
| ०१. | बी.कॉम. | १२ वी पास | ३/४ वर्षे |
| ०२. | बी.कॉम. (Foreign Trade) | १२ वी पास | ३/४ वर्षे |
| ०३. | बी.कॉम. (Computer Application) | १२ वी पास | ३/४ वर्षे |
| ०४. | बी.कॉम. (Banking & Insurance) | १२ वी पास | ३/४ वर्षे |
| ०५. | बी.कॉम. (Accounting & Taxation) | १२ वी पास | ३/४ वर्षे |
| ०६. | बी.कॉम. (Management & Entrepreneurship) | १२ वी पास | ३/४ वर्षे |
| ०७. | एम.कॉम. | बी.कॉम. पास | १/२ वर्षे |
| ०८. | बी.सी.ए. | १२ वी पास | ३/४ वर्षे |
| ०९. | बी.बी.ए. | १२ वी पास | ३/४ वर्षे |
| १०. | एम.बी.ए. | पदवी | २ वर्षे |
| ११. | एम.सी.ए. | पदवी | २ वर्षे |

विशेष सूचना : १. मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शासन नियमांनुसार शासनाची शिष्यवृत्ती व फी सवलत
२. बी.सी.ए. / बी.बी.ए./एम.बी.ए./एम.सी.ए. ची प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र शासनाच्या MAH-CET नुसार होईल.
३. PCB व PCM ची CET दिलेल्या विद्यार्थ्यांना बी.सी.ए. व बी.बी.ए. साठी थेट प्रवेश

Website : www.dcomm.org

प्रवेश देणे चालू आहे

अधिक माहितीसाठी

**बी.कॉम.** - श्री. शिवलिंग होटकर (९८२३१७५७५१), **एम.कॉम.** - श्री. सुमित जोशी (९६६५८४०७०७)
**बी.सी.ए.** व **बी.बी.ए.**- श्री. सचिन शिंदे (९७६५३६००१२), महाविद्यालय : ०२३८२-२२१३४९

डॉ. प्रशांत मान्नीकर, प्राचार्य, दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर
श्री. रमेश बियाणी, सचिव
श्री. लक्ष्मीरमण लाहोटी, अध्यक्ष
दयानंद शिक्षण संस्था, लातूर

## संपादकीय...

# सरकारच्या चुकीच्या धोरणाला कॉकरोच डंक मारणार का?

आता कॉकरोचचे वादळ थांबायचे नाय!देश विकासाच्या प्रगतीचे पथावर आहे ही बाब सत्य आहे,तरीही देशात बेरोजगारी,कुपोषण,भुकमरी,शेतकऱ्यांच्या आत्महत्यां, बेरोजगारांच्या समस्या,शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार आणि इतर क्षेत्रातील भ्रष्टाचार या सारख्या गंभीर समस्या आजही देशात घर करून बसल्या आहेत. कारण वाढल्या भ्रष्टाचाराने देशाला पोखरून टाकले आहे. वाढती बेरोजगारी व महागाईचा कळस यात बेरोजगार तरूण भरडल्या जात आहे आणि आता बेरोजगारांची तुलना कॉकरोच सोबत करून बेरोजगारांच्या जखमेवर मीठ चोळन्याचे काम सरन्यायाधीशांनी केले.त्यामुळे याचे पडसाद संपूर्ण देशभर व देशाच्या बाहेर सुद्धा उमटतांना दिसत आहे. आज देशातील वाढत्या बेरोजगारीमुळे युवा वर्ग त्रस्त आहे आणि यात महागाईने मोठी भर टाकुन देशाच्या युवावर्गासोबतच देशाच्या १४० कोटी जनतेला व्दीधेमध्ये टाकले. सरकारने स्वतःच्या स्वार्थासाठी अनेक मोफत सुविधा अंमलात आणुन आम जनतेच्या खिशाला मोठी कात्री लावली आहे व देशाची अर्थव्यवस्था चौपट झाल्याचे दिसून येते.यामुळे देशात शेतकरी वर्ग, बेरोजगार युवक,आम जनता अत्यंत त्रस्त आहे.कारण सरकारने लावलेली मोफत सुविधा याची संपूर्ण झळ महागाईच्या रूपात देशाच्या गरीब भोळ्याभाबड्या जनतेला भोगावी लागते आहे.मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांनी एका सुनावणी दरम्यान देशातील बेरोजगार तरूणांना झुरळ (कॉकरोच) म्हटले.ते म्हणाले की, काही बेरोजगार तरूण झुरळांसारखे (कॉकरोच सारखे) असतात,जे नंतर मीडिया, सोशल मीडिया किंवा आरटीआय कार्यकर्ते बनून व्यवस्थापनेवर हल्ला करू लागतात.या त्यांच्या वक्तव्याने देशातच नाही तर संपूर्ण जगभरात सोशल मीडियाच्या माध्यमातून खळबळ उडाली.शेवटी सरन्यायाधीशांनी म्हटले की, माझ्या वक्तव्याचा विपर्यास लावला. ही बाब आम्हीही समजु शकतो किंवा सत्य राहु शकते यात दुमत नाही.परंतु झुरळ (कॉकरोच) या शब्दने देशातील संपूर्ण बेरोजगार तरूणांनवर एवढा मोठा घाव केला की,तो भरून निघने शक्य नाही. कारण देशात आपण ताजे नीट पेपर लिक प्रकरण पहाले यात २५ हजार युवकांना त्याची झळ सोसावी लागत आहे व त्यांची मनःस्थिती विस्कळीत झाली आहे आणि चार ते पाच युवकांनी या प्रकरणाला कंटाळून आत्महत्या सुध्दा केल्याचे दिसून येते.म्हणजे तरूणांच्या डोळ्यासमोर शिक्षण प्रणालीची खुली हत्या होत आहे, त्याचप्रमाणे शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात लुट आताही सुरूच आहे, देशात करोडोंचे प्रोजेक्ट आल्याचे मिडियाच्या माध्यमातून सरकार कडून सांगितले जाते परंतु बेरोजगारांना अजुनही रोजगार उपलब्ध झालेला नाही, आज देशातील प्रत्येक जिल्ह्यातील किंवा शहरातील युवकांना त्यांच्या स्थानिक ठिकाणी रोजगार उपलब्ध नसल्याने आपला परिवार सोडून मुंबई,बंगलोर,पुणे,हैदराबाद,अहमदाबाद इत्यादी अनेक ठरावीक ठिकाणी रोजगारासाठी युवा वर्ग जातांना दिसतो.परंतु देशातील अनेक राज्यात स्थानिक पातळीवर पाहिजे त्याप्रमाणात रोजगार सरकार उपलब्ध करून देवू शकली नाही ही देशाची शोकांतिका आहे.त्यामुळे काही युवावर्ग पुणे, मुंबई, हैदराबाद, बंगलोर, अहमदाबाद अशा नामांकित ठीकाणी धाव घेतांना दिसतात.अशा ठिकाणी त्यांना रोजगार मिळाला तर ठीक आहे अन्यथा हताश होऊन आत्महत्या होतांना सुध्दा आपण पहिले आहे.अशा परिस्थितीत देशाचे उच्च पदस्थ अधिकारी बेरोजगारांची तुलना कॉकरोचसोबत करीत असेल तर हे स्वतंत्र भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल. सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी १५ मे २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयात एका खटल्याची सुनावणी करताना बेरोजगार तरुणांची तुलना झुरळांशी (कॉक्रोच) केली होती. वरिष्ठ वकील दर्जा मिळवण्याच्या याचिकेवर सुनावणी सुरू असताना, काही बेरोजगार तरुण झुरळांसारखे असतात, जे नंतर मीडिया, सोशल मीडिया किंवा आरटीआय कार्यकर्ते बनून व्यवस्थेवर हल्ला करू लागतात, असे ते म्हणाले होते. या वक्तव्यामुळेच देशभरात मोठे वादळ निर्माण झाले. यावर प्रतिक्रिया उमटत असताना, सरन्यायाधीशांनी नंतर स्पष्टीकरण दिले की, त्यांचे हे वक्तव्य भारतातील सर्वसामान्य तरुणांविषयी नसून, बनावट पदव्या असलेल्या आणि समाजमाध्यमांवरून विनाकारण यंत्रणेला लक्ष्य करणाऱ्या विशिष्ट घटकाबाबत होते. हीबाब ठीक आहे व सत्य राहु शकते.परंतु कॉकरोच या शब्दरचनेमुळे युवकांमध्ये एक जागृता निर्माण झाली आहे आणि कॉकरोचचा झुंड ( युवावर्ग) एकत्र झाला तर सरकारची मनमानी आणि भ्रष्टाचार बंद झाल्याशिवाय रहाणार नाही.आज देशाच्या प्रत्येक बेरोजगार तरूणांच्या मनात राजकीय पुढाऱ्यांन विषयीं व्देशभावना दिसून येते कारण आजी-माजी लोकप्रतिनिधी-जनप्रतिनिधी यांचे वेतन,भत्ते, पेंशन,गाडी, बंगला, मोठ्या प्रमाणात करोडों रूपयांची चलअचल संपत्ती ही बाब नेहमी काळजात खुपत असते.कारण हे लोकप्रतिनिधी पाच वर्षांत करोडपती होतात. लोकप्रतिनिधी-जनप्रतिनिधी हा देशाची जनतेची सेवा करण्यासाठी निवडून दिलेला प्रतिनिधि असतो.परंतु देशसेवा व जनसेवेला पाठ दाखवून स्वतःच्या सेवेत जास्त मग्न असतो आणि तेथुनच भ्रष्टाचाराचा उगम होतो.आज याच राजकीय पुढाऱ्यांमुळे देशाच्या सरकारी शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहेत.कारण याच राजकीय पुढाऱ्यांनी आपली मोठमोठी शाळा-महाविद्यालये खोलुन व्यवसाय थाटला आहे आणि आपल्या मुलांना शिक्षणासाठी विदेशात पाठवितात.यावरून स्पष्ट होते की, देशाच्या राजकीय पुढाऱ्यांनी स्वतःच्या स्वार्थासाठी देशाच्या शिक्षण व्यवस्थेला पोखरून टाकले आहे. त्यामुळे खरोखरच देशाला कॉकरोचची गरज आहे असे मला वाटते.कदाचित सरन्यायाधीशांना वाटले असावे की, युवा क्रांती व्हावी आणि तोच शब्द त्यांच्या तोंडून निघावा ही एक बेरोजगार तरूणांनसाठी टर्निंग पॉईंट असु शकतो आणि आता खरोखरच देशातील युवा बेरोजगार वर्ग एकत्र येण्याची खरी वेळ आली आहे.अमेरिका-इजरायल-इराण युध्दाला सुरुवात २८ फेब्रुवारी २०२६ ला सुरूवात झाली आणि या काळात देशातील पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका सुध्दा झाल्यात,मंत्री, प्रधानमंत्री,राज्यांचे मुख्यमंत्री,विरोधी पक्ष नेते इत्यादी संपुर्ण राजकीय फौजफाटा पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीमध्ये दोन महिने प्रचारात व्यस्त होता.या काळात करोडो लिटर पेट्रोल-डिझेलचा वापर झाला आणि मोठ्या देशाचा पैसा खर्च झाला तेव्हा पेट्रोल-डिझेल भाव एक पैसाही वाढला नाही व अर्थव्यवस्थेवर काहीच झळ पोहोचली नाही आणि आता युद्ध थांबता बरोबर व विधानसभा निवडणुका संपल्या बरोबर पेट्रोल-डिझेलचे भाव दहा दिवसांत चार वेळा वाढविण्यात आले हि गंभीर बाब आहे.कारण पेट्रोल -डिझेलमुळे सरकारला ७७ हजार कोटींचा नफा असुनही पेट्रोल-डिझेलचे चौथ्यांदा भाव वाढने ही देशासाठी धोक्याची घंटा आहे आणि सरकार सांगते की,देशाची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी आपण हे भाववाढ करीत असल्याचे सरकार मार्फत सांगितले जात आहे.सरकार भाव वाढीचे कारण आंतरराष्ट्रीय आयात-निर्यातचे कारण सांगत आहेत.ही तर देशाची व देशाच्या युवावर्गाची फसवेगिरीच म्हणावी लागेल. सरकार खोटी आश्र्वासने देऊन बेरोजगार तरूणांनच्या जखमेवर मीठ चोळन्याचे काम करीत आहेत.त्यामुळे कॉकरोच आता सरकारला सुखाची झोप कदापि घेऊ देणार नाही.कारण आज कॉकरोच सोबत, शेतकरी वर्ग,देशातील सर्वसामान्य वर्ग,कामगार वर्ग,मजुर वर्ग एकत्र येत आहे. त्यामुळे आता सरकारला युवा बेरोजगारांना न्याय द्यावाच लागेल अन्यथा कॉकरोच (झुरळ) त्यांचे सर्वांचे गड उध्दवस्त करतील.कॉकरोच या विधानानंतर सोशल मीडियावर 'कॉक्रोच जनता पार्टी' नावाची एक ऑनलाइन चळवळही सुरू झाली आहे आणि याला करोडो फालोअर आपली पसंती दाखवीत आहे.कारण सरन्यायाधीश सूर्यकांत म्हणतात की,काही बेरोजगार तरुण झुरळांसारखे (कॉकरोच सारखे) असतात. हे सरन्यायाधीशांचे वक्तव्य देशाच्या बेरोजगार तरूणांच्या जिव्हारी लागले आहेत.त्यामुळे बेरोजगारांमध्ये मोठ्या प्रमाणात आक्रोश वाढला असून युवा क्रांती निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. आपल्या देशात राजकीय वर्तुळात प्रथा आहे की,पहीले काहीही बोलून देणे आणि नंतर माफी मागणे किंवा माझा तो उद्देश नव्हता असे बोलून पळवाटा काढणे तेच काम माननीय सरन्यायाधीशांनी केल्याचे दिसून येते.असो जे होते ते चांगल्यासाठीच होते आणि हा तरूणांनसाठी एक चांगला टर्निंग पॉईंट राहावा असे मला वाटते.

# उपवर्गीकरण: एक शोध व एक बोध

Creamylayer: ताकदवान घोडे विरुध्द कमकुवत घोडे यांच्यातील नवा संघर्ष.

भाग एक: SUBCATEGORISATION

अनुसूचित प्रवर्गाचे अ ब क ड उपवर्गीकरण व बौध्द समाजातील विचारवंतांचे आकलन.२०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जात समुहांची लोकसंख्येची टक्केवारी खालीलप्रमाणे आहे.

१.बौध्द ८०,०६,०६० (६२.२२ टक्के),२.मातंग २४,८८,५३१ (१९.३४ टक्के),३.चर्मकार १४,११,०७२ (१०.९६ टक्के),४.भंगी २,१७,१६६ (१.६८ टक्के),५.ढोर १,१६,२८७ (०.९० टक्के),६.होलार १,०८,९०८ (०.८४ टक्के) ७.खाटीक १,०८,४९१ (०.८४ टक्के),८.मादगी ५६,४८१ (०.४३ टक्के),९.बसोर ५५,५६४ (०.४२ टक्के),१०.मेघवाल ४०,४१६ (०.३१ टक्के),११.उर्वरित ४९ जाती (२ टक्के) एकूण १० अनुसूचित जात समुहांची लोकसंख्या १,२६,०९,३९३ (अ) एकुण ९८ टक्के उर्वरित ४९ अनुसूचित जात समुहांची लोकसंख्या २,५७,४८७ (ब) एकुण २ टक्के एकुण लोकसंख्या (अ+ब) १,२८,६६,७८०

न्यायालयाच्या निवाड्यानुसार अ,ब,क,व ड असे उपवर्गीकरण केल्यास १३ टक्के आरक्षणाची टक्केवारी खालीलप्रमाणे होईल.

१.बौध्द ८.०९ टक्के (आरक्षण ८ टक्के),२.मातंग २.५१ टक्के (आरक्षण२.५ टक्के),३.चर्मकार १.४३ टक्के (आरक्षण १.५ टक्के),४.४९ जाती २ टक्के (आरक्षण १ टक्के ) (अनुसूचित जातींसाठी सध्या २९ मतदारसंघ राखीव आहेत.जर उपवर्गीकरण झाले तर फक्त बौध्द समाजासाठी १८ राखीव मतदारसंघ उपलब्ध होतील.) शंभर जागांची शासकीय पदभरतीची जाहिरात निघाली तर मातंग समाजासाठी २.५ जागा चर्मकार समाजासाठी १.५० जागा व उर्वरित समाजासाठी १ जागा व बौध्द समाजासाठी ८ जागांवर उमेदवारांची निवड होईल.उपवर्गीकरणाची मागणी फक्त मातंग समाजच करीत आहे. ह्या मागणीस उर्वरित ५८ अनुसूचित जातींचा पाठिंबा आहे काय? चर्मकार व इतर ४९ जाती शंभर जागांपैकी अनुक्रमे २.५ व १ जागेवर समाधान मानतील का? वरील टक्केवारींचा अभ्यास केल्यास ह्या उपवर्गीकरणामुळे बौध्द समाजालाच सर्वाधिक लाभ होणार आहे. परंतु, समस्त आब्राह्मण समाजाचे आंबेडकरी विचारांचे स्वयंघोषित नेते व कार्यकर्ते तसेच आंबेडकर अनुयायी ह्या उपवर्गीकरणाला का विरोध करीत आहेत.हे समजण्याच्या पलिकडचे आहे!

जाती/जमातींचे उपवर्गीकरण ह्यापूर्वीही अनेक राज्यांनी केलेले आहे.आपण फक्त महाराष्ट्र राज्य विचारार्थ घेऊ या.

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी -१०९३/ २१६७/सीआर-१४१/९३/१६ ब दिनांक २३ मार्च १९९४ अन्वये मंडल आयोगाच्या शिफारशीनुसार खालीलप्रमाणे सुधारित आरक्षण विहीत करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.(१) अनुसूचित जाती १३ %,(२) अनुसूचित जमाती ७ %,(३) विमुक्त जाती व भटक्या जमाती,(अ) विमुक्त जाती ३%,(ब) भटक्या जमाती २.५%,(क) भटक्या जमाती (धनगर) ३.५%,(ड) भटक्या जमाती (वंजारी) २%,(४) इतर मागास वर्ग १९%,(५) विशेष मागास वर्ग २% एकुण आरक्षण ५२% (क्र.१ व २ चे आरक्षण घटनात्मक व उर्वरित आरक्षण वैधानिक आहे.विशेष मागास वर्ग २% आरक्षण ढहश त्रेंशीपाशपीं छोंळषळलरींळेप ेष ऊशलशालशी ८, १९९४ प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे.) महाराष्ट्रातील प्रमुख उभे आरक्षण (सरकारी नोकऱ्या) १.अनुसूचित जाती (SC) - १३%,२.अनुसूचित जमाती (ST) - ७%,३. विमुक्त जाती (VJ-A) - 3 %,४.भटक्या जमाती NTAB - २.५%,५.भटक्या जमाती NTAC (धनगर) - ३.५%,६.भटक्या जमाती NTAD (वंजारी) - २%,७. विशेष मागास प्रवग© (SBC)- 2%,८. इतर मागासवर्गीय (OBC) - 19%,९. SEBC (मराठा समाज) - १०%,१०. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) -१०% EWS हे स्वतंत्र आर्थिक निकषांवर आधारित आरक्षण असून, ते गैर-आरक्षित पात्र उमेदवारांसाठी लागू होते.एकूण आरक्षण किती? अ) पारंपरिक सामाजिक आरक्षण (SC/ST/OBC/VJNT/SBC) मिळून सुमारे ५२ %,ब)SEBC (मराठा) जोडल्यास उभे आरक्षण,क) सुमारे ६२ %,ड) EWS स्वतंत्र १०% एकुण आरक्षण ७२ टक्के त्यामुळे प्रत्यक्ष भरतीमध्ये लागू रचना ही संबंधित कायदे, रोस्टर आणि न्यायालयीन स्थितीवर अवलंबून असते. आडवे आरक्षण खालील प्रवर्गांसाठी स्वतंत्र आडवे आरक्षण (Horizontal) लागू असू शकते: १.महिला २.दिव्यांग (PwD) ३.माजी सैनिक ४.क्रीडापटू ५.अनाथ ६.प्रकल्पग्रस्त हे आरक्षण प्रत्येक मुख्य प्रवर्गाच्या (SC, ST, OBC, Open इ.) आत लागू केले जाते.

भाग दोन: CREAMYLAYER

Creamy layer निकषाला SC/ST तील प्रस्थापित धनाढ्य लाभार्थींचा का विरोध आहे? मला उंच झाडे आवडत नाहीत मला डेरेदार वृक्ष आवडतात. कारण, उंच झाडे दूरून दिसतात पण ही झाडे कधी वाटसरूला उन्हात सावली देत नाहीत, पावसाळ्यात आडोसा देत नाहीत. प्रा. मा.फ.गांजरे यांनी बाबासाहेबांचे जे भाषण खंड लिहिलेले आहेत.त्या एका भाषण खंडात बाबासाहेबांनी विद्यार्थ्यांना उद्देशून केलेल्या भाषणात 'तुम्ही डेरेदार वृक्ष व्हा उंच झाडे होऊ नका; डेरेदार वृक्षाप्रमाणे आपल्या समाजाला सावली द्या' असा उपदेश केल्याचे डॉ.आंबेडकर कॉलेज, वडाळा, मुंबई येथे शिकत असताना वाचल्याचे आठवते.

समजा शंभर जागांची पोलीस उपनिरीक्षकांची जाहिरात,मंत्रालयात शंभर सहायकांची किंवा ऋद्धढ मध्ये शंभर राज्यकर निरीक्षकांची जाहिरात निघाली. साहजिकच अनुसूचित जातींसाठी १३ टक्के म्हणजे १३ जागा राखीव आहेत. ह्या जागांसाठी जेव्हा स्पर्धात्मक परीक्षा घेतली जाईल तेव्हा काय परिस्थिती असेल. अ) ज्या उमेदवारांच्या वडील स्वत: शासकीय सेवेत आहेत त्यांची पत्नीही शासकीय सेवेत उच्च पदावर कार्यरत आहेत, चांगल्या २/३ रुम किचनमध्ये राहतात.आई वडिलांकडे मुबलक पैसा असल्यामुळे ते त्यांच्या मुलाला चांगले क्लासेस लावू शकतात घर मोठं असल्यामुळे मुलगा घरात चांगला अभ्यास करु शकतो.आई वडिलांचे वार्षिक उत्पन्न आठ लाखाच्या पलिकडे आहे. ब) ह्या उलट ज्या मुलाला काबाडकष्ट करुन गरीब आई वडिलांना शिक्षण दिलेले आहे.ज्याचे वडील कंपनीत मजूर म्हणून काम करतात,कष्टकरी जीवन जगतात राहण्यासाठी सोई सुविधा असलेले घर नाही,मुलाला चांगल्या क्लासेस पाठवायला पैसा नाही. ज्याच्या आई वडिलांचे मर्यादित उत्पन्न आहे. क) ह्या अ व ब गटांच्या घरातील मुले स्पर्धात्मक परीक्षेला बसली तर अ गटातील मुलगा/मुलगी परिक्षेत यशस्वी होईल की,ब गटातील मुलगा/मुलगी यशस्वी होईल. सामाजिक अन्याय गटातील मुलगा/मुलगी स्पर्धात्मक परिक्षेत यशस्वी होईल. काही अपवादात्मक परिस्थितीत ब गटातील मुलगा/मुलगी यशस्वी होईल. ड) जर अ गटातील आर्थिकदृष्ट्या भक्कम असलेल्या उमेदवारांने स्वत:हून सवलत नाकारली तरच ब गटातील गरीब मुलाला संधी मिळणार आहे,तो यशस्वी होणार आहे. परंतु,असे कधीच घडत नाही. म्हणूनच सर्वोच्च न्यायालयाने निकालात सरकारने CREAMY LAYER चा निकष लावावा, असे मत (observation) व्यक्त केलेले आहे. उच्च विद्याविभूषित SC ST च्या लोकांच्या भवितव्याची चिंता करू नका.काही सन्माननीय अपवाद वगळल्यास हे लोक मोठ मोठी पदे शासकीय कार्यालयात भोगून स्वत:च्या मुलांबाळांचे करिअर घडविण्याशिवाय स्वत:च्या समाजाला काडीचीही मदत करीत नाहीत. उदाहरणार्थ आरक्षणाचे लाभार्थी असलेल्या डॉक्टरने स्वत:ची मुले कशी डॉक्टर केली,अधिकाऱ्यांनी स्वत:च्या मुलांना कसे अधिकारी केले, प्राध्यापक व्यावसायिक केले. इंजिनियरने स्वत:च्या मुलांना इंजिनियर केले. अशा रसभरीत आत्मकथा लिहून समाजाला आपली थोरवी सांगत असतात.समाज तर लांबच राहिला स्वत:च्या सख्ख्या भावालाही हे लोक मदत करीत नाहीत.स्वत: उच्चवर्णीय महिलांशी संसार थाटतात समाजाकडे ढुंकूनही बघत नाहीत. एकच मुलगा असलेले सरकारी जावई मुंबईत तीन फ्लॅट घेतात गावी बंगले बांधतात पण कधी भावा बहिणीच्या मुलांना शिक्षणासाठी मदत करीत नाहीत, समाजात मिसळत नाहीत,बुध्द विहारे बांधण्यासाठी आर्थिक योगदान देत नाहीत. एवढे सगळं करुन आयुष्यात काय कमावल ह्याचा ताळेबंद ( Balance Sheet) करुन दु:ख भोगायची वेळ आणि कायमचे डोळे मिटायची वेळ आल्यावर डोळे मिटून गोयंकागुरुजीची विपश्यना करीत बसतात. हे settled लोक मी कसा मोठा झालो,मी कसा श्रीमंत झालो.मी कसे मोठे बंगले बांधले. माझी मुले कशी परदेशात शिकली व परदेशात राहत आहेत.ह्याची जाहीरात करीत असतात. पण, ह्यांनी स्वत:च्या समाजासाठी किती व कुठे योगदान केले. ह्याच्या कथा कधीच ऐकायला व वाचायला मिळत नाही.

SC ST च्या लोकांना उत्पन्नाची अट नाही. त्यामुळे IAS, IPS, IFS, IRS व Class One अधिकारी मंडळी SC ST तील गरीब मुलांपेक्षा उच्च प्रतीचे शिक्षण देतात. साहजिकच गरीब मुलांना तेवढे उच्च प्रतीचे शिक्षण मिळत नाही हे गरीब मुलांच्या नोकऱ्या हडप करतात. स्वत:च्या समाजाशी फारकत घेतलेल्या असल्या आप्पलपोट्यांच्या नोकऱ्या वाचल्या काय आणि गेल्या काय? सामान्य गरीब SC ST लोकांना काही फरक पडत नाही. माझा जातवाला मोठा साहेब झाला.म्हणून गरीब माणसांनी आनंद होण्यात काहीच अर्थ नाही. आणि ज्यांचे उत्पन्न creamy layer च्या पलिकडे गेलेले आहे. त्यांना आरक्षणाच्या जागा आपल्या गोरगरीब बांधवांसाठी नको का शिल्लक ठेवायला? दुसरी महत्वाची गोष्ट ज्या बाबासाहेबांच्या उपकारांमुळे SC व ST लोक सरकारी नोकऱ्या करतात त्यांच्या घरांत कधी बाबासाहेबांचा फोटो नसतो आणि वेडपट SC Sr.No.37 ह्यांना आरक्षणे मिळावीत म्हणून आंदोलने करीत असतात. उलटपक्षी SC व ST च्या उमेदवारांस घटनेत सुधारणा करुन creamylayer च्या अटी लागू केल्या पाहिजेत. जेणेकरून SC व ST च्या गरीब होतकरू व गरजवंत उमेदवारांना शासकीय सेवांची कवाडे उघडतील! असे माझे कायमच स्पष्ट मत होत व आहे. सर्वोच्च न्यायालयाने अबकड उपवर्गीकरण करावे व creamylayer चे निकष लावावेत असे मत व्यक्त केलेले आहे, हा निकष लावा. असे स्पष्ट निर्देश दिलेले नाहीत. राज्य सरकारला हे बदल करण्यासाठी प्रथम emperical data गोळा करावे लागेल,राज्यपालांची मंजुरी घ्यावे लागेल. कारण, SC/ST आरक्षण हे घटनात्मक आहे ((Consttutional) आरक्षण आहे वैधानिक (Statutary) नाही. यास्तव, SC/ST च्या आरक्षणाला न्यायालयात आव्हान देता येत नाही.वैधानिक आरक्षणाला न्यायालयात आव्हान देता येते.उदाहरणार्थ मराठा आरक्षण. SC Sr. No 37 धर्मांतरीत बौध्द प्रचंड भेदरून गेलेले आहेत. ह्या निकषामुळे आपल्या गोरगरीब बंधू भगिनींना शासकीय सेवांत (नसलेल्या) नोकऱ्या मिळतील मग आमच्या मुलांच्या भवितव्य अंधकारमय होईल त्यांना खुल्या प्रवर्गातून स्पर्धा करावी लागेल, ह्या चिंतेने ग्रासलेले आहे.ह्यांना घटनात्मक हक्क व कर्तव्य ह्याच्याशी काहीही देणंघेणं नाही. विशेष म्हणजे SC 59 ,ST 47 d OBC 346 जातींना महाराष्ट्र राज्यात आरक्षण लागू आहे.ह्या एकुण ४५२ आरक्षण लाभार्थी समुदाय सर्वोच्च न्यायालयाच्या विरुध्द काहीच भाष्य करताना दिसत नाहीत.फक्त SC SR. NO.37 हिंदू महार (धर्मांतरीत बौध्द) च प्रतिक्रिया देत आहेत. वास्तविक,ह्या निर्णयाचा सर्वाधिक लाभ बौध्द समाजाला होणार आहे. कारण,बौध्द समाजाची लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार ६२ टक्के आहे.अ ब क ड उपप्रवर्ग निर्माण झाले तर १३ टक्केपैकी ८ टक्के आरक्षण एकट्या बौध्द समाजाला मिळणार आहे.अर्थात क्रिमिलेअर लागू झाल्यास श्रीमंत बौध्दांना ह्या आरक्षणाचे मिळणार नाहीत. त्यामुळेच श्रीमंत बौध्द समाजाचा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाला विरोध आहे. आरक्षणाचे लाभ घेऊन श्रीमंत झालेले व समाजापासून फारकत घेतलेले हे SC व ST चे आरक्षण आर्थिक निकषांवर नाहीतर तर ते सामाजिक व शैक्षणिक निकषांवर आहे. असे सांगून गरीब SC व ST बांधवांनी फक्त आरक्षणासाठी आंदोलने करुन श्रीमंत लोकांची आरक्षणे अबाधित ठेवावीत,ह्यासाठी आपले बुध्दिकौशल्य वापरतात.ज्या प्रस्थापित श्रीमंत व्यक्तींवर सामाजिक अन्याय होतो. (मूळात प्रस्थापित व श्रीमंत व्यक्तींची घरेदारे कधी जाळली जात नाहीत:अन्याय गरीब समाजावर होतो.) असा अन्यायाचा अपराध करणाऱ्यांना शिक्षा करण्यासाठी घटनेचे १७ वे कलम आहे शिवाय स्वतंत्र Autrocity Act,1989 आहे.त्यामुळे SC व ST च्या समुदायाने CREAMY LAYER चा निकष आम्हास लावू नये, अशी मागणी करणे संयुक्तिक नाही.

न्यायालयाने उप-वर्गीकरण अनिवार्य केलेले नाही; त्यांनी फक्त त्याला परवानगी दिली आहे. त्याउपर हा निर्णय घेण्याचा अधिकार राज्य सरकारांना देण्यात आला आहे, कारण अनुसूचित जाती- जमातींची परिस्थिती वेगवेगळ्या राज्यांमध्ये वेगवेगळी आहे. जर आरक्षण सामाजिक व शैक्षणिक निकषांवर आधारित आहे तर आपल्या समाजाचा सामाजिक व शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी आरक्षण लाभार्थींनी किती व कोणते प्रयत्न केले? हा संशोधनाचा विषय आहे.बाबासाहेबांनी घटनेत आरक्षणाची तरतूद फक्त स्वत:चा स्वार्थ जपावा, आत्मोन्नती करावी व मौजमजा करावी ह्यासाठी केलेली नाही. निकालपत्रातला एकमेव वादाचा मुद्दा म्हणजे 'क्रीमीलेयर' किंवा अनुसूचित जातींमधील विशेषाधिकारित विभागांना वगळण्याचे समर्थन करणारी चार न्यायमूर्तींची टिप्पणी. ही तरतूद आतापर्यंत इतर मागासवर्गाला लागू होती, अनुसूचित जाती किंवा जमातींना लागू नव्हती. त्यातही विचित्र गोष्ट अशी आहे की, या प्रकरणात न्यायालयासमोर हा मुद्दा नव्हता, तरीही न्यायाधीशांनी यासंदर्भात त्यांचे मत मांडले आहे. थोडक्यात, अनुसूचित जाती व जमातींना 'क्रिमी लेयर' अनिवार्य करणे, हा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे, There is equality only among equals,To equate unequals is to perpetuate inequality. समान माणसांमधे फक्त समानता असू शकते. असमानांना समान मानणे म्हणजे असमानता टिकविणे.समजा,एखादा सरकारी बौध्द अधिकारी ज्याला एक लाख पगार आहे व जो Two/Three BHK मध्ये राहतो, ज्याची मुले चांगल्या महागड्या शाळा कालेजात शिकतात व एखादी गरीब बौध्द कामगार चाळीत राहतो,ज्याला पगार वीस हजार आहे,ज्याची मुले साध्या शाळा कालेजात शिकतात. किंवा एखादा बौध्द गावात मोठ्या कष्टाने मुलांचे शिक्षण पूर्ण करतो. तर ह्या तिन्हीपैकी सरकारी सेवांत नोकरभरती साठी स्पर्धात्मक परिक्षेत कोण मेरीटमध्ये येईल? समान संधीसाठी विशेष संधी ह्या सिध्दांत नुसार राखीव जागा ठेवाव्याच लागतील. क्रिमिलेअरचा निकष लागू झाल्यास श्रीमंत वर्गाला खुल्या प्रवर्गातून स्पर्धात्मक परीक्षा द्याव्या लागतील व आरक्षित जागांवर क्रिमिलेअरमध्ये न येणाऱ्या गरीब घटकाला आरक्षणचे लाभ मिळू शकतात. आरक्षण हा गरीबी हटविण्याचा कार्यक्रम नाही. असे बहुतेक आरक्षण समर्थक उर बडवून सांगत असतात. तथापि, बहुतेक आरक्षण लाभार्थींनी स्वतःची गरीबी हटविण्यापलिकडे काय केलेले आहे. ह्याचा आरक्षण लाभार्थींनी अंतर्मुख होउन विचार करावा. आरक्षणाचे समर्थन करणाऱ्या आंबेडकरी समाजाने ह्या आप्पलपोट्या आरक्षण लाभार्थींनी आत्मोन्नती करण्यापलीकडे काय केलेले आहे? ह्याचा शोध घ्यावा. (माझ्या ह्या मताला काही सन्माननीय अपवाद असू शकतात!) सशक्त घोडा जसा जोरात टांगा पळवतो तसा अशक्त घोडा टांगा पळवू शकत नाही. जर अशक्त घोड्याला सशक्त करावयाचे असेल तर सशक्त घोड्याने आपल्यातील थोडाफार खुराक अशक्त घोड्यालाही शिल्लक ठेवला पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निर्णयानुसार जर राज्य सरकारांनी क्रिमिलेअरचे निकष SC व ST प्रवर्गाचे उपप्रवर्ग तयार करुन लागू केले तर निश्र्चितपणे अशक्त घोड्यांनाही आरक्षणाचा खुराक मिळू शकतो! Justice B.R. Gavai- drew on the reasoning from Indra Sawhney, where justice Jeevan Reddy had emphasised that if some members of a backward class advance significantly in terms of social, economic or educational status, they no longer share the same level of disadvantage as the rest of the group. In such cases, the connecting thread between them and the remaining class snaps, making them misfits in the class, justice Reddy had held while adding that excluding these advanced members would actually benefit the truly backward. This reasoning, according to justice Gavai, was equally applicable to SC/STs, especially given the disparities within these communities. By judicial interpretation, the equality enshrined in the trinity of -rticles 14 to 16 of the Constitution has been considered to be equal treatment among equals and unequal treatment among unequals. The question that will have to be posed is, whether equal treatment to unequals in the category of Scheduled Castes would advance the constitutional objective of equality or would thwart it? *Can a child of I-S/IPS or Civil Service Officers be equated with a child of a disadvantaged member belonging to Scheduled Castes, studying in a Gram Panchayat/Zilla Parishad school in a village? he asked. In reality, this observation of Justice B.R.Gavai was not to destroy the basic structure of the Constitution. -ccording to -rticle 368 (1) (2), if any amendment is to be made in the Constitution, it has to be passed in the Parliament first. It means that the Supreme Court has not directed the Government to implement the creamy layer criteria. It is an observation of the Supreme Court, threrefore it is not fair to comment against the Supreme Court's Judgment. Perhaps,Justice B.R.Gavai being himself a member of Scheduled Caste, he might have realised these economical inequalities and dared express observation, he is deserved to be congratulated.(01/08/2024) जे समताळू व ममताळू आंबेडकरवादी सतत राजर्षी शाहू राजांचा जयजयकार करतात त्या नवश्रीमंत आंबेडकरवाद्यांनी शाहू राजांचे आरक्षणाबाबत काय विचार होते ते समजून घेतले पाहिजेत. त्या विचारांचे स्वत:च्या जीवनातही आचरण केले पाहिजे......!

क्रिमिलेअरच्या निकषाला पाठिंबा देऊन.... शाहू महाराजांच्या बहुजनांना आरक्षण देण्याच्या निर्णयावर अभ्यंकर नावाच्या एका वकीलाने आक्षेप घेतला. तुम्ही आरक्षण कुठल्या न्यायाने दिलं, असा सवाल केला. ज्याच्यात क्षमता आहे, तो पुढे जाईल, असं त्याने शाहू महाराजांना सांगितलं. महाराजांनी वकीलाचं म्हणणं शांतपणे ऐकून घेतलं. घोड्याच्या पागेत बसलेल्या शाहू महाराजांनी वकीलाला तिथेच एक प्रयोग करून दाखवला. शाहू महाराजांनी मोतदारांना घोड्यांची चंदी जमिनीवर टाकायला सांगितली. सगळीकडे चंदी टाकण्यात आली. नंतर महाराजांनी घोड्यांचा सांभाळ करणारे जे मोतदार होते त्यांना सांगितलं, सगळे घोडे सोडून द्या. मोतदारांनी पागेतली सर्व घोडे सोडून दिले. मोतदारांनी जसं सोडून दिलं तसं घोडे चंदी खाण्यासाठी तुटून पडले. पण सगळी चंदी धष्टपुष्ट घोड्यांनीच खाऊ टाकली. सर्व चंदी फस्त केली. अशक्त,कमजोर, लुळीपांगळी घोडी, तसंच मागं राहिली. मग शाहू महाराजांनी त्या वकीलाला सांगितलं, माझं आरक्षण धोरण हे अशा लोकांसाठी आहे. जे लोक धष्टपुष्ट नाहीत, कमजोर, कमकुवत आहेत, अशा लोकांसाठी आहे. धष्टपुष्ट, ताकदवान घोडी कमजोर, कमकुवत घोड्यांना काहीच खाऊ देत नाहीत. आरक्षण अशाच कमकुवत लोकांना आरक्षण धोरणातून संधी दिली जाते. नेहमीप्रमाणे समस्त SC व ST चे विनाशुल्क वकीलपत्र घेऊन आंबेडकरवादी सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय कसा चुकीचा आहे, हे प्रतिपादन करुन ह्या निर्णयाविरुध्द एकटेच लढा उभारतील. ह्या तथाकथित आंबेडकरवादी वकिलांना हार्दिक शुभेच्छा! माझं तर स्पष्ट म्हणण आहे उपवर्गीकरण झालंच पाहिजे व सोबत Creamylayer ची अटसुध्दा लागू झाली पाहिजे.

---

**शरद आढाव**
९८३३१७५६६९,भांडुप.
राजपत्रित अधिकारी (सेवानिवृत्त)
महाराष्ट्र राज्य, मुंबई

---

**टीप - १९७५ मध्ये, पंजाब हे अनुसूचित जातींचे (SC) उप-वर्गीकरण करण्याचा प्रयत्न करणारे पहिले राज्य ठरले. यासाठी त्यांनी २५% अनुसूचित जाती आरक्षणाचा कोटा विभागण्यासाठी एक अधिसूचना जारी केली. लाभांचे अधिक न्याय्य वितरण सुनिश्र्चित करण्यासाठी, त्यांनी वाल्मिकी आणि मजहबी शीख समुदायांना प्राधान्य दिले आणि त्यांच्यासाठी अर्धा कोटा (१२.५%) राखीव ठेवला. कायदेशीर आव्हाने येईपर्यंत हे धोरण ३० वर्षे टिकले.**

## विविध वृत्त...

### केज तालुक्यात वादळ आणि अवकाळी पावसाचा पुन्हा फटका...!



**केज/प्रतिनिधी:** केज तालुक्यात सोमवारी रात्री ८-०० वाजता व मध्यरात्री झालेल्या अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे उतरेश्र्वर पिंप्री, कापरेवाडी, बोरगाव ( बु.), नाव्होली, नांदूरघाट, राजेगाव, काळेगाव घाट परिसरात विजेचे खांब,पडून व विजवाहक तारा तुटून पडल्या आहेत. नाव्होली ते केज राज्य वरस्त्यावर ७ ठिकाणी झाडे उन्मळून पडले आहेत. उतरेश्र्वर पिंप्री येथिल तुकाराम चंदनशिव यांच्या शेतातील शेततळ्यात पाणी असतांनाही शेत तळ्यातील मेनकापड उडून गेल्यामुळे शेततळ्यातील पाणी कमी झाले आहे. त्यांच्या डाळिंबाच्या झाडाखाली सडा पडला आहे, शेतातील जनावरांचा गोटाही आहे.बोरगावातील बाबुराव वळेकर यांच्या हौदाच्या परिससरातील व नरसूबा शेतातील एकूण १० विजेचे खांब पडून विजेच्या तारा तुटल्या आहेत.

### शेलगाव गांजी येथे अवकाळी पावसाचा तडाखा; शेतकऱ्याच्या गोठ्याचे मोठे नुकसान



**केज/प्रतिनिधी:** केज तालुक्यातील शेलगाव गांजी येथे अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्याने मोठ्या प्रमाणात हाहाकार माजवला.जोरदार वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे शेतकरी अमोल जाधव यांच्या गाय गोठ्यावर मोठे जांभळीचे झाड कोसळल्याने गोठा पूर्णतःउध्वस्त झाला आहे.वादळी वाऱ्याच्या तडाख्यामुळे झाड अचानक गोठ्यावर पडल्याने गोठ्यावरील पत्रे,लाकडी साहित्य व बांधकामाचे मोठे नुकसान झाले.घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केले.सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. अवकाळी पावसामुळे शेतकरी अमोल जाधव यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून शासनाने तात्काळ पंचनामा करून आर्थिक मदत व भरपाई द्यावी, अशी मागणी करण्यात येत आहे.परिसरातील इतर शेतकऱ्यांनाही अवकाळी पावसाचा फटका बसला असून प्रशासनाने नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा,अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

### महेश खरे यांचा अभिष्टचिंतन सोहळा जुईनगर येथे उत्साहात साजरा



**नवी मुंबई / के. एच. हनवते :** नवी मुंबईचा बुलंद आवाज, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया नवी मुंबई जिल्हाध्यक्ष : मान. महेश जी खरे यांचा अभिष्टचिंतन सोहळा जुईनगर येथील भिमालय सभागृह - मुलगंध कुटी बुद्धविहार या ठिकाणी विविध स्तरातील कार्यकर्त्यांच्या उपस्थितीमध्ये वाढदिवस अतिशय उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला, त्यावेळी वाढदिवसाच्या मंगलमय हार्दिक शुभेच्छा देताना शुभेच्छुक : लॉर्ड बुद्धा कल्याण प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष : कल्याणराव हनवते (बौद्धाचार्य-पत्रकार) आणि वंचित बहुजन आघाडी नवी मुंबई जिल्हा महासचिव : सुनील भोले यांच्या वतीने भारताचा महान ग्रंथ भारतीय संविधान भेट देऊन त्यांना उदंड आयुष्य लाभो हीच शुभेच्छा..! आयु. महेश खरे यांनी त्यांच्या सामाजिक कार्यात ज्वेल्स ऑफ नवी मुंबई पार्क मध्ये लॉर्ड बुद्धांच्या भव्य दिव्य मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे आणि असेच कार्य त्यांच्या हातून पुढील कारकिर्दीत, लवकरात लवकर नवी मुंबईतील बेलापूर विभागात आधुनिक भारताचे संविधान निर्माते, बोधिसत्व परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णकृती पुतळा उभारण्याचे बळ त्यांना मिळो हीच सदिच्छा..!

# महानाग विज्ञासन शाक्यमुनी भिक्षु संघाचे जुईनगर येथे हार्दिक स्वागत

**नवी मुंबई / के. एच. हनवते :** अखिल नवी मुंबई संयुक्त नागरी जयंती महोत्सव समिती महानाग शक्यमुनी विज्यासन (भारतातील पहिली बुद्धिस्ट सेमिनरी) यांच्यावतीने दिनांक : १९ एप्रिल ते ०२ मे या कालावधीमध्ये थायलैंड येथील प्राचीनबुरी प्रांतातील वट पा मोफाई या वीस एकरातील सुंदर व सुसज्ज विहारात पुज्य भदंन्त : विमलकित्ती गुणसिरी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली भिक्षू प्रशिक्षण आणि ध्यान साधना शिबिर पूर्ण केलेल्या मुंबईतील उपासक - उपासिका यांचा भव्य स्वागत समारंभ प्रबुद्ध सेवा संघ व आम्रपाली महिला मंडळ, जुईनगर नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, सदर कार्यक्रमासाठी थायलैंड येथे गेलेल्या बंधू भगिनी पैकी कर्जत,





दहिसर, मुंबई, नेरूळ पनवेल, पुणे येथील बौद्ध उपासक / उपासिका यांनी उपस्थित राहून आपल्या भिक्षु प्रशिक्षणाचा थायलैंड या बौद्ध राष्ट्राची संस्कृती आणि प्रेरणादायी अनुभव कथन केले तसेच पूज्य भदंन्त : विमलकित्ती गुणसिरी यांची धम्मदेसना ग्रहण केली, भदंन्त विमलकित्ती गुणसिरी आपल्या प्रवचनात म्हणाले की, प्रशिक्षित भिक्षू असल्याशिवाय तसेच आचरणशील बौद्ध धम्म दिक्षित उपासक / उपासिका असल्याशिवाय भारत बौद्धमय करणे..! हे बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न साकारता येणार नाही..! थायलैंड वरून आलेल्या भिक्षू प्रशिक्षितांचा स्वागत समारंभ प्रबुद्ध सेवा संघ जुईनगर येथील कार्यक्रमासाठी नवी मुंबईतील विविध भागातून बौद्ध उपासक - उपासिका शेकडोंच्या संख्येने उपस्थित होते या सर्व उपस्थितांनी बौद्ध राष्ट्र थायलैंडचे गुणगान कथन केले, शेवटी धम्मपालन गाथा घेऊन कार्यक्रम संपन्न केला.

## आंबेनळी घाटातील रेस्क्यू ऑपरेशन २२ तासांनी संपलं, छिन्नविछिन्न मृतदेह पाहून ट्रेकर्सही गहिवरले!

**सातारा/प्रतिनिधी :** महाबळेश्वर-पोलादपूर मार्गावरील आंबेनळी घाटात शनिवारी (२३ मे) रात्री एक भीषण अपघात घडला. स्कॉर्पिओ जीप सुमारे २१०० फूट खोल दरीत कोसळून ८ जणांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेनंतर बचावकार्य तब्बल २२ तास सुरू होतं. अखेर रात्री ८ वाजता शेवटचा मृतदेह दरीतून बाहेर काढण्यात बचाव पथकांना यश आलं आणि ऑपरेशन पूर्ण झालं.

या कठीण रेस्क्यू मोहिमेदरम्यान बचाव पथकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. महाबळेश्वर ट्रेकर्स, प्रतापगड सर्च अँड रेस्क्यू टीम आणि महाड येथील सिस्केप टीम यांनी संयुक्तपणे हे बचावकार्य पार पाडलं.

वास्तविक, शनिवारी रात्रीच्या अंधारात स्कॉर्पिओ गाडी दरीत कोसळल्याचं कोणाच्याही लक्षात आलं नाही. मात्र, या तरुणांच्या कुटुंबीयांनी रविवारी (२४ मे) सकाळपासून शोधाशोध सुरु केल्यानंतर रविवारी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास स्कॉर्पिओ कार खोल दरीत पडल्याचं निदर्शनास आलं आणि अपघात झाल्याचं निष्पन्न झालं.

पावणे दहा वाजता गाडी पडल्याचा मेसेज : आंबेनळी घाटात गाडी दरीत कोसळल्याचा संदेश महाबळेश्वर ट्रेकर्सना रविवारी (२४) रात्री पावणे दहा वाजता मिळाला. त्यानंतर प्रतापगड सर्च अँड रेस्क्यू टीमचे सदस्य अनिकेत वागदरे, सोमनाथ वागदरे आणि संकेत सावंत तातडीने घटनास्थळाकडे रवाना झाले.

घटनास्थळी पोहोचल्यानंतर आंबेनळी घाटातील एका भागात टॉर्चच्या प्रकाशात पाहणी करण्यात आली असता संशयास्पद परिस्थिती दिसून आली. त्यानंतर इतर सदस्यांना पाचारण करण्यात आलं आणि काही वेळातच सर्वजण आवश्यक साहित्य घेऊन घटनास्थळी दाखल झाले.

२२ तास चाललं रेस्क्यू ऑपरेशन : यानंतर ट्रेकर्सनी रेस्क्यू सेटअप तयार करून रोपच्या सहाय्यानं दरीत उतरण्यास सुरुवात केली. खाली पोहोचल्यानंतर सुरुवातीला एक गाडी आढळली, मात्र ती पूर्वीच्या अपघातातील असल्याचं स्पष्ट झालं. त्यामुळे दुसऱ्या बाजूनं पुन्हा शोधमोहीम सुरू करण्यात आली. दरम्यान महाडची सिस्केप टीमही मदतीसाठी घटनास्थळी दाखल झाली.

## केज तालुक्यातील वादळी पावसामुळे मोठे नुकसान

### तात्काळ पंचनामे करून मदत द्यावी-युवा नेते ऋषीकेश आडसकर यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदार यांना दिले निवेदन



**केज/प्रतिनिधी:** केज तालुक्यातील युसुफवडगाव व आडस मंडळ परिसरात दि. २३ मे रोजी झालेल्या अवकाळी पाऊस व चक्रीवादळामुळे मोठ्या प्रमाणावर शेती, वीज व्यवस्था तसेच नागरिकांचे नुकसान झाले आहे. या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई व आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी केज तहसीलदार यांना निवेदनाद्वारे करण्यात आली.

तसेच मौजे सोनिजवळा येथील शेतकरी कै. दिगांबर ससाणे यांचा अंगावर वीज कोसळल्याने दुर्दैवी मृत्यू झाला. त्यांच्या कुटुंबाला शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन निधीतून तात्काळ आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली. वादळामुळे अनेक गावांमध्ये वीज पोल व तारा धोकादायक अवस्थेत असल्याने संबंधित अधिकाऱ्यांनी त्वरित दुरुस्ती करून संभाव्य दुर्घटना टाळाव्यात, अशी सूचनाही निवेदनात करण्यात आली.

हे निवेदन अंबेजोगाई सहकारी साखर कारखान्याचे संचालक तथा केज पंचायत समितीचे माजी उपसभापती युवा नेते ऋषीकेशभैय्या आडसकर यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले.

यावेळी केज कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती श्री अंकुशराव इंगळे, युवा नेते रणजित आडसकर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष श्री अमर पाटील, युवक अध्यक्ष श्री शिवदास थळकरी, ओबीसी सेलचे तालुकाध्यक्ष श्री गोविंदराव ससाणे, बाजार समितीचे संचालक तथा सरपंच श्री कैलास पाटील, श्री सुशिलभैय्या अंधारे, श्री कदम यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, लातुर यांचे कार्यालय

### (दंडणीय विभाग)

संदर्भ - १. उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर ग्रामीण यांचे पत्र क्रं.१७१ दिनांक ३१.१२.२०२५ २. पोलीस स्टेशन, एमआयडीसी यांचे आखेर आ. मयत क्रं. ८६/२०२५ कलम १९४ दि- ३१.१२.२०२५

३. श्री. बालाजी पंढरी साळुंके रा. लातूर यांचा अर्ज दिनांक - १३.०३.२०२६ जा.क्रं.२०२६/

दंडणीय/ओ.मृ/कावी-५३ दिनांक - १३.०४.२०२६

### जाहीर प्रगटन

याव्दारे कळविण्यात येते की, मौजे नांदगाव ता.जि.लातूर येथील रहिवासी मयत नाम पवन बालाजी साळुंके वय ३२ वर्षे रा.नांदगांव ता.जि. लातूर येथे Elebbm¡btion या कारणाने मृत्यु झालेला आहे. असे उपरोक्त संदर्भा नुसार दिसून येते.

तरी सदर मयत व्यक्तीचे मृत्यु चे कारणाबाबत कोणाच्या हरकती अथवा आक्षेप असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाले पासून ३० (तिस) दिवसांचे आत तहसील कार्यालय, लातूर येथे हजर राहून आपल्या हरकती लेखी स्वरूपात कळवाव्यात आणि या लेखा वरून असे कळविण्यात येते की, जर मुदतीत कोणतीही योग्य हरकती अथवा लेखी आक्षेप प्राप्त नाही झाल्यास कोणाचीही काहीही हरकत / तक्रार नाही. असे गृहीत धरून प्रकरण ३० दिवसा नंतर निकाली काढून संबंधीताची अंतिम समरी मंजुर करण्यात येईल यांची नोंद घ्यावी स्वाक्षरीत / -

स्वाक्षरीत / -
**कार्यकारी दंडाधिकारी, लातूर**

## तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, लातुर यांचे कार्यालय

### (दंडणीय विभाग)

संदर्भ - १. उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर ग्रामीण यांचे पत्र क्रं. ८०४ दिनांक ०३.०४.२०२५ २. पोलीस स्टेशन, लातूर ग्रामीण यांचे आखेर आ. मयत क्रं. १०/२०२५ कलम १९४ दि- १७.०४.२०२५

३. श्रीमती संगीता विजकुमार कोद्रे जा.क्रं.२०२६/दंडणीय /आ.मृ/कावी-५४ रा. लातूर यांचा अर्ज दिनांक १६.०२.२०२६

### जाहीर प्रगटन

याव्दारे कळविण्यात येते की, मौजे गंगापुर ता.जि.लातूर येथील रहिवासी मयत नामे विजयकुमार रामभाऊ कोद्रे वय ५० वर्षे रा.गंगापुर ता.जि. लातूर येथे Septicemia due to Burn या कारणाने मृत्यु झालेला आहे. असे उपरोक्त संदर्भा नुसार दिसून येते.

तरी सदर मयत व्यक्तीचे मृत्यु चे कारणाबाबत कोणाच्या हरकती अथवा आक्षेप असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाले पासून ३० (तिस) दिवसांचे आत तहसील कार्यालय, लातूर येथे हजर राहून आपल्या हरकती लेखी स्वरूपात कळवाव्यात आणि या लेखा वरून असे कळविण्यात येते की, जर मुदतीत कोणतीही योग्य हरकती अथवा लेखी आक्षेप प्राप्त नाही झाल्यास कोणाचीही काहीही हरकत / तक्रार नाही. असे गृहीत धरून प्रकरण ३० दिवसा नंतर निकाली काढून संबंधीताची अंतिम समरी, मंजुर करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत / -
**कार्यकारी दंडाधिकारी, लातूर**

## खरी सेवा आणि विश्वासाचे फळ - बिस्वा रंजन

एका लहानशा गावात आनंद नावाचा एक गरीब युवक राहत होता. त्याचे कुटुंब अतिशय साधे होते, पण त्याचे संस्कार खूप उच्च होते. आनंद रोज सकाळी मंदिरात जाऊन भगवान जगन्नाथांची पूजा करत असे आणि नंतर गावातील लोकांच्या मदतीसाठी बाहेर पडत असे. गावात अनेक वृद्ध लोक एकटे राहत होते, ज्यांची काळजी घेणारे कोणी नव्हते. आनंद कोणताही स्वार्थ न ठेवता त्यांच्यासाठी औषधे आणत असे, अन्न शिजवत असे आणि त्यांच्या घरांची स्वच्छता करत असे. लोक त्याच्या गरिबीमुळे आश्र्चर्यचकित होत असत, कारण कठीण परिस्थितीत राहूनही तो इतरांची मदत करणे कधीच थांबवत नव्हता. त्याची आई नेहमी म्हणत असे की खरी पूजा फक्त मंदिरात दिवा लावणे नाही, तर गरजूंना सेवा करणे आहे. हीच शिकवण आनंदाच्या जीवनाचा सर्वात मोठा आधार बनली होती.

एक दिवस गावात खूप जोरदार पाऊस पडला आणि नदीचे पाणी वाढू लागले. अनेक घरांमध्ये पाणी शिरले आणि लोक भीतीमुळे आपली घरे सोडून पळू लागले. त्या वेळी आनंदाने स्वतः चा विचार न करता गावकऱ्यांना मदत करायला सुरुवात केली. तो लहान मुले आणि वृद्धांना सुरक्षित ठिकाणी पोहोचवत होता. त्याने संपूर्ण रात्र जागून लोकांना अन्न आणि पाणी पुरवले. गावातील लोक त्याच्या धैर्याने आणि सेवाभावनेने भावूक झाले. अनेकजण फक्त स्वतःचा जीव वाचवण्यात गुंतले होते, पण आनंद इतरांचे प्राण वाचवण्यात व्यस्त होता. त्या कठीण काळात त्याने सिद्ध केले की माणसाची खरी ओळख त्याच्या कर्मांनी होते, धनसंपत्तीने नाही.


पाऊस थांबल्यानंतर गावाची स्थिती खूप वाईट झाली होती. शेती नष्ट झाली होती आणि अनेक कुटुंबांकडे खाण्यासाठी काहीच उरले नव्हते. आनंदाने गावातील तरुणांना एकत्र केले आणि सर्वांना एकत्र काम करण्यासाठी प्रेरित केले. त्याने सांगितले की आपण एकमेकांचा आधार बनलो तर प्रत्येक अडचण पार करू शकतो. हळूहळू गावातील लोक एकत्र येऊन तुटलेली घरे दुरुस्त करू लागले. आनंदाने आपल्या छोट्या घरात गरजूंना राहण्याची जागा दिली. त्याची निस्वार्थ सेवा पाहून जवळच्या शहरातील काही सामाजिक संस्था देखील गावाच्या मदतीसाठी पुढे आल्या.

काही महिन्यांनंतर गावात एक मोठा धार्मिक उत्सव आयोजित करण्यात आला. त्या कार्यक्रमाला जिल्हाधिकारीही उपस्थित होते. त्यांनी गावकऱ्यांना विचारले की या कठीण काळात सर्वाधिक मदत कोणी केली. सर्वांनी एकाच आवाजात आनंदाचे नाव घेतले. अधिकाऱ्यांनी आनंदाला मंचावर बोलावले आणि त्याचे कौतुक केले. आनंदाने नम्रपणे सांगितले की त्याने फक्त आपले कर्तव्य पार पाडले आहे. तो म्हणाला की प्रत्येक व्यक्तीने आपल्या आसपासच्या लोकांना मदत केली तर समाजात कधीही दुःख आणि एकटेपणा राहणार नाही. त्याचे शब्द ऐकून सर्वांच्या डोळ्यांत पाणी आले.

त्या कार्यक्रमानंतर आनंदाची ओळख संपूर्ण जिल्ह्यात पसरली. अनेक लोक त्याला मदत करू इच्छित होते, पण आनंदाने फक्त एवढेच सांगितले की जर लोकांना खरोखरच त्याचा सन्मान करायचा असेल तर त्यांनी गरीब आणि गरजूंना मदत करावी. हळूहळू गावात बदल घडू लागला. लोक आधीसारखे फक्त स्वतःबद्दल विचार करत नव्हते. ते एकत्र येऊन काम करू लागले आणि एकमेकांच्या सुखदुःखात साथ देऊ लागले. गावात प्रेम, सहकार्य आणि बंधुत्वाचे वातावरण निर्माण झाले.

एक दिवस आनंदाची आई खूप आजारी पडली. गावकऱ्यांनी एकत्र येऊन त्यांच्या उपचाराची व्यवस्था केली. ज्या लोकांना कधी आनंदाने मदत केली होती, तेच आता त्याच्या कुटुंबासाठी उभे राहिले. त्या दिवशी आनंदाला जाणवले की खरी सेवा कधीच वाया जात नाही. जो व्यक्ती इतरांच्या जीवनात आनंद पसरवतो, देव त्याच्या जीवनातही सुख आणि शांती भरतो. त्याची आई हळूहळू बरी होऊ लागली आणि संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

वेळ निघून गेला आणि आनंदाची कहाणी दूरदूरपर्यंत लोकांसाठी प्रेरणादायी बनली. लोक आपल्या मुलांना त्याची कहाणी सांगून सेवा, दया आणि



मानवतेचे महत्त्व समजावू लागले. आनंद नेहमी म्हणत असे की माणसाची सर्वात मोठी ताकद त्याचे चांगले हृदय असते. धन आणि प्रसिद्धी काही काळ आनंद देऊ शकतात, पण इतरांना मदत केल्याने मिळणारी आत्मिक शांती आयुष्यभर सोबत राहते. म्हणूनच आजही त्या गावातील लोक आनंदाला फक्त एक माणूस नाही, तर मानवतेचे खरे प्रतीक मानतात.

**श्री बिस्वा रंजन साहू, कुवैत**
**लेखक, रिपोर्टर, आंतरराष्ट्रीय सामाजिक कार्यकर्ता**

## बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीक विम्याची नुकसानभरपाई मिळण्यासाठी तातडीने निर्णय घ्या- कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रधानमंत्री पीक विमा योजना अंतर्गत खरीप हंगाम २०२५ मधील बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळण्याबाबत बँका आणि विमा कंपन्यांसोबत तातडीने बैठक घेऊन योग्य निर्णय करण्यात यावेत, अशा स्पष्ट सूचना कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिल्या.

मंत्रालयात आयोजित बैठकीत प्रधानमंत्री पीक विमा योजना अंतर्गत बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम न मिळाल्याच्या प्रश्नावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी आमदार विजयसिंह पंडित, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, कृषी संचालक विनयकुमार आवटे तसेच शेतकरी प्रतिनिधी उपस्थित होते.कृषिमंत्री भरणे म्हणाले की, खरीप हंगाम २०२५ पासून राज्यात सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना उत्पादन आधारित पद्धतीने आणि पीक कापणी प्रयोगांच्या आधारे राबविण्यात येत आहे. बीड जिल्ह्यात या योजनेची अंमलबजावणी आयसीआयसीआय लोम्बार्ड जनरल इन्श्युरन्स कंपनी लिमिटेडमार्फत करण्यात येत असून, पिकांच्या नुकसानभरपाईसाठी एसडीआरएफ आणि एनडीआरएफच्या निकषांनुसार कार्यवाही केली जाते. शेतकऱ्यांना वेळेत आणि न्याय्य नुकसानभरपाई मिळणे अत्यंत महत्त्वाचे असून, संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्य करून प्रलंबित प्रश्न मार्गी लावावेत, असेही त्यांनी सांगितले. आमदार विजयसिंह पंडित यांनी केंद्र शासनाने पीक विम्यासंदर्भातील रद्द केलेले काही निकष पुन्हा विचारात घेऊन आवश्यक बदल करावेत, अशी मागणी यावेळी केली.

## जीवघेणं संकट! उन्हानं चक्कर आली अनब खाली कोसळले, जनगणना करताना शिक्षकाचा मृत्यू, सोलापुरात हळहळ

**सोलापूर/प्रतिनिधी :** यंदा उन्हाळी सुट्टीत शिक्षकांना जनगणनेचे काम करावे लागत आहे. त्यातच महाराष्ट्रात सूर्य आग ओकत असल्यासारखी स्थिती असून सोलापूर जिल्ह्यात देखील प्रचंड उष्णता जाणवत आहे. भर उन्हात जनगणनेच्या कामासाठी बाहेर पडलेल्या सांगोला विद्यमंदिर प्रशालेच्या आदर्श शिक्षकाचा दुर्दैवी मृत्यू झाला. सोमवारी (२५ मे) दुपारच्या सुमारास ही घटना घडली. राजाराम दामोदर ढोले असे ४९ वर्षीय मृत शिक्षकाचे नाव आहे. राष्ट्रीय कर्तव्यावर असताना घडलेल्या दुर्दैवी घटनेमुळे शैक्षणिक क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे.

पान १ वरून...

## माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री, लोकनेते विलासराव देशमुख यांना ८१ व्या जयंतीनिमित्त विलासबागेत जनसमुदायाचे भावपूर्ण अभिवादन

सुनील पडीले, कार्यकारी संचालक कल्याण पाटील, कार्यकारी संचालक आत्माराम पवार, एस.डी.बोखारे, आर.बी.माने, जितेद्र देहाडे, डॉ. लक्ष्मण देशमुख, प्राचार्य बाबासाहेब गोरे, प्राचार्य अजय पाटील, गणपतराव बाजूळगे, संतोष सोमवंशी, रवींद्र काळे, ड. समद पटेल, संतोष देशमुख, सचिन बडापल्ले, संचालक कैलास पाटील, मदन भिसे, बंकट भिसे, रणजीत पाटील, अमृत जाधव, सुभाष माने, अनंत बारबोले, भैरवनाथ सवासे, व्यंकटेश पुरी, अनिल पाटील, सतिश पाटील, व्ही. के.आचार्य, दगडूअप्पा मिटकरी, विदया पाटील, सुनीता आरळीकर, सपना किसवे, स्वंयप्रभा पाटील, प्रिती भोसले, स्वाती पवार, संगीता मोळवणे, मीना सुर्यवंशी, केशरबाई महापूरे, खाजबानू बुऱ्हाण अन्सारी, उषा चव्हाण, उपसरपंच गोविंद देशमुख, लक्ष्मी भोसले, दगडूसाहेब पडिले, रामानुज रांदड, प्रा. गोविंद घार, श्याम भोसले, प्रा. डी. एन. केंद्रे, प्रकाश कासट, कृष्णकुमार बागड, प्रविण सुर्यवंशी, सुर्यकांत कातळे, प्रविण कांबळे, पाडुरंग वीर, जितेंद्र स्वामी, डॉ. बालाजी साळुंके, बालाजी वाघमारे, बालाप्रसाद बिदादा, गुरुनाथ गवळी, लक्ष्मण मोरे, जयचंद भिसे, फैसल कायमखानी, श्रीनीवास शेळके, संभाजी रेड्डी, चंद्रकांत चिकटे, धिरज पाटील, प्रशांत पाटील, बबन देशमुख, ड. देवीदास बोरुळे पाटील, तुकाराम आडे, राजकुमार जाधव, पृथ्वीराज शिरसाठ, अशोक गोविंदपूरकर, बसवंतआप्पा बरडे, डॉ. एस.एन. जटाळ, इसरार सगरे, अमर मोरे, दिपक पटाडे, राजेद्र मस्के, निलेश फेरे, अतिश चिकटे, विकास कांबळे, गिरीष ब्याळे, विष्णू धायगुडे, अभिषेक पतंगे, नारायण ढोरमारे, गोटू यादव, संजय निलेगावकर, सोनू डगवाले, रमेशसिंह बिसेन, डॉ. अरविंद भाताब्रे, राजकूमार पाटील, राजेद्र काळे, कलीम तांबोळी, युवराज जाधव, बसवराज धरणे, सुरेश धानुरे, अमित पांडे, प्रदिप गगणे, बादल शेख, फारुख शेख, भैरवनाथ सूर्यवंशी, उमाकांत जाधव, सतिश हलवाइ, लक्ष्मीकांत मंठाळे, संजय पाटील खंडापूरकर, ड. विजय गायकवाड, सुनील बसपूरे, विकास वाघमारे, जयदेव मोहीते, श्रीशैल गडगडे, राम स्वामी, डॉ.दिनेश नवगिरे, पुनीत पाटील, बालाजी वाघमारे, मारुती पांडे, सुपर्ण जगताप, नंदकिशोर पापा मोदी, पवन देशमुख, धोंडीराम यादव, मुक्ताराम पिटले, गोविंद देशमुख, विजयकुमार साबदे, रामदास पवार, एकनाथ पाटील, गोविंद केंद्रे, विजयकुमार धुमाळ, माधव गंभीरे, आनंद वैरागे, पवन गायकवाड, चक्रधर शेळके, अभिजीत इगे, गणेश देशमुख, नरसिंह बुलबुले, मनोज पाटील, बळवंत पाटील, प्रदिप राठोड, ॲड. शरद देशमुख, तात्यासाहेब देशमुख, निखील पाटील, जयदेव बर्वे, महादेव मुळे, बालाजी पाराशर, सचिन सुर्यवंशी, लिंबराज पवार, सहदेव मस्के, अविनाश देशमुख, गोरोबा लोखंडे, हमीद शेख, अशोक पाटील, हणमंत पवार, अशोक देडे, शिवाजी कांबळे, रमेश देशमुख, नाना जाधव, वाल्मीक माडे, संजय बिराजदार, किरण बनसोडे, अविनाश बटटेवार, श्रीकांत बैले, सुमीत खंडागळे, विनोद वाकडे, सतीश हलवाई, पत्रकार जयप्रकाश दगडे, राम जेवरे, हरी तुगावकर, राजू पाटील, अरूण समुद्रे, शहाजी पवार, दिपरत्न निलंगेकर, एजाज शेख, संजय सगरे, विनोद चव्हाण, यशवंत पवार, हरीराम कुलकर्णी, संजय पाटील, आनंद दणके, रवीकिरण सुर्यवंशी, अंकलकोटे, श्रीकांत पाटील, संतोष बिराजदार आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर, विविध पक्ष, संघटना, संस्थांचे पदाधिकारी, काँग्रेस पक्ष व संलग्न संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि हितचिंतक यांनी विलासराव देशमुख यांच्या भावपूर्ण आठवणी जागवल्या. या सभेचे सूत्रसंचालन विवेक सौताडेकर यांनी केले.

# रक्तदानातून मानवतेची सेवा हेल्मेटमधून सुरक्षिततेचा संदेश

## वाढवणा व अहमदपूर पोलीस ठाण्यांचा समाजाभिमुख उपक्रम; एकूण २२२ रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग





**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्हा पोलीस दलामार्फत सामाजिक बांधिलकी, मानवतेची जाणीव आणि जनजागृतीचा संदेश देणारे विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत. त्याच अनुषंगाने मा. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या संकल्पनेतून पोलीस स्टेशन वाढवणा तसेच अहमदपूर पोलीस ठाणे यांच्या वतीने भव्य रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या समाजाभिमुख उपक्रमास नागरिक, युवक, सामाजिक कार्यकर्ते तसेच पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

वाढवणा पोलीस स्टेशन येथे आयोजित रक्तदान शिबिरामध्ये १४५ पुरुष व ६ महिला अशा एकूण १५१ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान केले. तसेच अहमदपूर पोलीस ठाण्याकडून आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरामध्ये ७१ बाटल्या रक्तसंकलन करण्यात आले. अशा प्रकारे दोन्ही उपक्रमांमधून एकूण २२२ रक्तदात्यांचे रक्त संकलित करण्यात आले असून, उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या रक्तटंचाईच्या परिस्थितीत हा उपक्रम अनेक गरजू रुग्णांसाठी जीवनदायी ठरणार आहे.

''रक्तदान हेच श्रेष्ठ दान'' या उदात्त भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरामध्ये युवकांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला. विशेष म्हणजे, रक्तदानासोबतच रस्ते सुरक्षा आणि वाहतूक नियमांविषयी जनजागृती करण्यासाठी अभिनव उपक्रमही राबविण्यात आला. वाढवणा पोलीस स्टेशनकडून रक्तदान करणाऱ्या सर्व रक्तदात्यांना हेल्मेट भेट देण्यात आले. त्यामुळे ''दुसऱ्याचे जीवन वाचविण्यासाठी रक्तदान आणि स्वतः चे जीवन सुरक्षित ठेवण्यासाठी हेल्मेट'' असा दुहेरी सामाजिक संदेश प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचविण्यात आला.

या प्रसंगी मा. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी रक्तदात्यांचे अभिनंदन करत समाजहितासाठी पोलीस दलामार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांमध्ये नागरिकांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले यांनीही उपस्थित रक्तदात्यांशी संवाद साधून त्यांच्या सामाजिक योगदानाचे कौतुक केले. सदर उपक्रमांमुळे पोलीस दलाची समाजाभिमुख भूमिका अधोरेखित झाली असून पोलीस व नागरिक यांच्यातील विश्वास आणि समन्वय अधिक दृढ होत असल्याचे चित्र पाहायला मिळाले. वाढवणा व अहमदपूर पोलीस ठाण्यांनी राबविलेल्या या उपक्रमांचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, समाजहितासाठी अशा उपक्रमांची नितांत आवश्यकता असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

## महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित पूर्व परीक्षा रविवारी; लातूर शहरातील ९ परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे रविवार, ३१ मे २०२६ रोजी महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित गट-अ व गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ आयोजित करण्यात आली असून, या परीक्षेच्या कालावधीत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी लातूर शहरातील परीक्षा केंद्रांच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये शहरातील ९ परीक्षा उपकेंद्रांच्या १०० मीटर परिसरामध्ये हे प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित गट-अ व गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा ३१ मे रोजी सकाळी १० ते दुपारी १२ आणि दुपारी ३ ते सायंकाळी ५ अशा दोन सत्रांमध्ये पार पडणार असून हे आदेश परीक्षेच्या दिवशी सकाळी ०८.०० वाजेपासून ते सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत लागू राहतील. या आदेशानुसार परीक्षा केंद्र परिसरात प्रवेश करतेवेळी परीक्षार्थी व्यतिरिक्त ५ किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींना एकत्रितरीत्या प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरातील झेरॉक्स सेंटर्स, पानटपऱ्या, टायपिंग सेंटर्स, एसटीडी बूथ आणि ध्वनिक्षेपक इत्यादी माध्यमे आदेशाची मुदत संपेपर्यंत पूर्णपणे बंद ठेवावी लागणार आहेत. परीक्षा सुरळीत व शांततेच्या वातावरणात पार पाडण्यासाठी केंद्र परिसरात कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यास, शांततेस बाधा निर्माण होईल असे कृत्य करण्यास आणि कोणत्याही अनाधिकृत व्यक्ती वा वाहनास प्रवेश करण्यास सक्त मनाई असेल. याशिवाय परीक्षा केंद्र परिसरात मोबाईल फोन, सेल्युलर फोन, ई-मेल व इतर कोणतीही प्रसार माध्यमे घेऊन प्रवेश करण्यास पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. हे प्रतिबंधात्मक आदेश परीक्षा उपकेंद्रावर कार्यरत असणारे अधिकारी, कर्मचारी, परीक्षार्थींवर निगराणी ठेवणारे पर्यवेक्षक आणि पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना त्यांच्या परीक्षाविषयक कर्तव्याच्या अनुषंगाने लागू असणार नाहीत.

लातूर शहरातील नांदेड रोडवरील यशवंत विद्यालय, खाडगाव रोडवरील सरस्वती विद्यालय, नांदेड रोडवरील जिजामाता कन्या प्रशाला, नारायण नगरमधील परिमल माध्यमिक विद्यालय, दयाराम रोडवरील श्री गोदावरीदेवी लाहोटी कन्या विद्यालय, सरस्वती कॉलनीतील श्री शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शाहू चौकातील ज्ञानेश्वर विद्यालय, नंदी स्टॉप येथील पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन (पॉलिटेक्निक) महाविद्यालय आणि श्याम नगरमधील श्री केशवराज विद्यालय येथे परीक्षा होणार आहे.

## कर्तृत्ववान व्यक्तींची पद्म पुरस्कारांसाठी शिफारस करणार - मंत्री जयकुमार रावल

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींना राष्ट्रीय गौरव मिळवून देण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे; तसेच प्रसिद्धीपासून दूर राहून विविध क्षेत्रात दूरगामी समाजहितासाठी सातत्यपूर्ण आणि समर्पित कर्तृत्व बजावणाऱ्या व्यक्ती समाजासाठी प्रेरणादायी असतात, अशा असामान्य व्यक्तींची पद्म पुरस्कारासाठी शिफारस करण्यात येणार असल्याचे राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले.

पद्म पुरस्कार शिफारस समितीची मंत्रालयात आज मंत्री रावल यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीस समितीचे सदस्य शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले; तसेच राजशिष्टाचार विभागाचे सचिव राजेश गवांदे उपस्थित होते. मंत्री रावल म्हणाले की, महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांमध्ये निस्वार्थपणे कार्य करणाऱ्या गुणवंत व्यक्तींना पद्म पुरस्कारांच्या माध्यमातून राष्ट्रीय स्तरावर सन्मान मिळून देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. शिफारस करताना केवळ प्रसिद्धीपेक्षा समाजासाठी केलेले प्रत्यक्ष योगदान, कार्यातील सातत्य आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व यांना प्राधान्य देण्यात यावे; तसेच पद्म पुरस्कारांचा दर्जा आणि प्रतिष्ठा कायम राखण्यासाठी खऱ्या अर्थाने उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचीच निवड होणे आवश्यक आहे.

राज्यातील कला, साहित्य, शिक्षण, सामाजिक कार्य, विज्ञान, कृषी, उद्योग, पर्यावरण, लोकसेवा आदी विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना राष्ट्रीय स्तरावर सन्मान मिळावा, यासाठी सर्वंकष छाननी करून अंतिम शिफारसी केंद्र शासनाकडे पाठविण्यात येणार असल्याचे बैठकीत नमूद करण्यात आले.

### दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त

## पोद्दार हॉस्पिटलमध्ये आयोजित अस्थिरोग शिबिरात ९८ रुग्णांची तपासणी - उपचार

**लातूर/प्रतिनिधी :** दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या ८१ व्या जयंतीदिनाचे औचित्य साधून येथील पोद्दार हॉस्पिटलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या अस्थिरोग शिबिरास अत्यंत उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला. या शिबिरात तब्बल ९८ रुग्णांची तपासणी - उपचार करण्यात आले.

या शिबिराच्या उदघाटन प्रसंगी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ज्येष्ठ नेते उल्हासदादा पवार, लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे , महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस जितेंद्र देहाडे, अभिजीत देशमुख, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके, महापौर जयश्रीताई सोनकांबळे, उपमहापौर एड. स्नेहल उटगे, विलास बँकेचे चेअरमन एड. किरण जाधव, माजी उपमहापौर कैलास कांबळे, माजी नगरसेविका खाजाबानू बुऱ्हाण, श्याम धूत, विजय पस्तापुरे , संजीव भार्गव, दीपक वारद , आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. उपस्थित सर्व मान्यवरांनीही प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली. लातूरच्या वैद्यकीय क्षेत्रात मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिरांचा पॅटर्न निर्माण करण्याचे काम करणाऱ्या डॉ.अशोक पोद्दार यांच्या हॉस्पिटलच्या वतीने आजपर्यंत आयोजित करण्यात आलेले हे १७५ वे अस्थिरोग शिबीर होते, हे विशेष.

जे जे काही नवीन ते ते आपल्या लातूरला हवे या भावनेने लोकनेते विलासराव देशमुख यांनी लातूरला सर्वांगसुंदर बनवण्याचा ध्यासच घेतला होता. प्रत्येक क्षेत्रात आपले लातूर अव्वल राहिले पाहिजे या हेतूने त्यांनी जवळपास सर्वच क्षेत्रातील व्यावसायिक - उद्योजकांना कायम प्रोत्साहित करण्याचे काम केले होते. आज लातूरच्या वैद्यकीय क्षेत्रातील नेत्रदीपक प्रगतीमध्येही या दिवंगत लोकनेत्याच्या दूरदृष्टीचा सिंहाचा वाटा आहे, ही बाब कोणीही नाकारणार नाही. आजच्या या उदघाटनप्रसंगी आपल्या भावना व्यक्त करताना खा. डॉ. शिवाजी काळगे यांनी डॉ. अशोक पोद्दार आणि आरोग्य शिबीर हे लातूरच्या वैद्यकीय क्षेत्रासाठी एक अतूट नाते बनल्याचे मत व्यक्त केले. दिवंगत लोकनेत्याच्या पुण्यतिथी - जयंतीदिनी ते नियमित अशा प्रकारच्या शिबिराचे आयोजन करतात. रुग्णसेवेस प्राधान्य देण्याबरोबरच समाजातील , तळागाळातील रुग्णांनाही अशा शिबिरांच्या माध्यमातून दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असतात,असेही खा. डॉ. काळगे यांनी सांगितले.

# हिराकाशी वृद्धाश्रमात अन्नधान्य वाटप उपक्रम

## लोकनेते विलासराव देशमुख यांच्या ८१ व्या जयंतीनिमित्त विलास युनिट-२ तोंडार येथे अभिवादन

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि माजी केंद्रीय मंत्री लोकनेते आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांच्या ८१ व्या जयंतीनिमित्त विलास सहकारी साखर कारखाना युनिट-२, तोंडार येथे विविध सामाजिक उपक्रमांद्वारे त्यांना भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली. या जयंतीचे औचित्य साधून कारखान्याच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत वृद्धाश्रमात अन्नधान्य वाटप करण्यात आले.

मंगळवार, दि. २६ मे रोजी सकाळी ११.०० वाजता विलास सहकारी साखर कारखाना युनिट-२, तोंडार येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी आदरणीय विलासरावजी देशमुख साहेब यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून कारखान्यातील






सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वतीने भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली. कारखाना स्थळावरील मुख्य अभिवादन कार्यक्रमानंतर, विलासरावजींच्या सामाजिक विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी कारखान्यामार्फत 'हिराकाशी वृद्धाश्रम सेवालय, धेडिहिप्परगा' येथे अन्नधान्य वाटप करण्याचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. या माध्यमातून कारखान्याने आपली सामाजिक कृतज्ञता व्यक्त केली.

या संपूर्ण उपक्रमास कारखान्याचे निमंत्रित संचालक राजेंद्र पाटील आणि पंडीत ढगे यांच्यासह कार्यकारी संचालक ए. आर. पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी कारखान्याचे वर्क्स मॅनेजर अजय कोळगे, चिफ केमीस्ट भाऊसाहेब खरात, मुख्य शेतकी अधिकारी श्रीराम पाटील, कार्यालय अधीक्षक अरविंद देशमुख, ऊस पुरवठा अधिकारी जनार्दन पाटील, असिस्टंट ऊस पुरवठा अधिकारी बालाजी सोनटक्के, सिव्हील इंजिनिअर एस. एच. देशमुख, संतोष मुढे यांच्यासह सर्व विभागांचे प्रमुख, कारखान्यातील कर्मचारी आणि कामगार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.